धनसंतोष

साप्ताहिक धनसंतोष, कोरेगांव जि. सातारा (महाराष्ट्र)

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# डी. पी. भोसले कॉलेजचा पारितोषीक वितरण समारंभ संपन्न



गुणवंत खेळाडूंना पारितोषीक प्रदान करताना प्रा. व. बा. बोधे सोबत प्राचार्य डॉ. अरविंद बुरुंगले, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत आदी.

कोरेगांव । दिवसेंदिवस लोकांच्या ओठावरील भाषा बदलत आहे, अस्सल ग्रामीण बोलीचे महत्व कधीही कमी होणार नाही. इंग्रजी हे वाघीणीचे दूध असले तरी ग्रामीण मराठी बोली ही नागिणीचे दूध असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यीक व कथाकार प्रा. व. बा. बोधे यांनी व्यक्त केले.

येथील डी. पी. भोसले कॉलेजच्या वार्षिक पारितोषीक वितरण समारंभात प्रा. बोधे बोलत होते. रयत शिक्षण संस्थेचे माजी सचीव प्राचार्य डॉ. अरविंद बुरुंगले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे माजी सहसचीव प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य ज्ञानदेव भोसले, किसनवीर कारखान्याचे संचालक ॲड. प्रभाकर बर्गे, धनसंतोषचे संस्थापक भाऊसाहेब नलावडे, शहाजीराव बर्गे, विजयराव बर्गे, चंचळीचे सरपंच तुषार कदम, डॉ. शि. म. पंचादेवी आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. बोधे पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या ग्रामीण भागातील समाजावर नितांत श्रध्दा ठेवावी, ग्रामीण बोली भाषेतही यशाचे शिखर गाठता येते, ग्रामीण बोलीमध्ये जे सौंदर्य आहे. ते भाषेत नाही. विद्यार्थ्यांनी राजकारणापासून दूर राहून गुणवत्तेच्या जोरावर अन्य क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवावा असे आवाहनही प्रा. बोधे यांनी व्यक्त केले.

यावेळी प्राचार्य डॉ. बुरुंगले, प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी आपल्या मनोगतात डी. पी. भोसले कॉलेजच्या प्रगतीचे कौतुक केले. एन.सी.सी. युनीटचाही यावेळी त्यांनी विशेष नामोल्लेख केला.

प्रारंभी प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी केले. उपप्राचार्य डॉ. दत्तात्रय गाताडे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. जिमखाना अहवालाचे वाचन जिमखाना विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब भोसले यांनी केले. विद्यार्थी प्रतिनिधी धनश्री जगदाळे यांनी शुभसंदेशाचे वाचन केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत खेळाडू, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विपुल इंगवले याचा विशेष सत्कारही करण्यात आला. प्रा.सौ. उज्वला मदने, प्रा.सौ. पद्मीनी मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. श्रीमंत शिंदे यांनी आभार मानले.